# करिअर-अभ्यासक्रमाची निवड आणि प्रवेशाचं आव्हान पेलताना.....

## १०वी-१२वी निकाल




वर्षभर घाम गाळून विद्यार्थी व पालकांना प्रतिक्षा असते ती निकालांची ! साहजिकच निकालाची उत्कंठा सर्वांनाच लागून राहते आणि खासकरून विद्यार्थ्यांना ! परंतु त्याचं रूपांतर गंभीर ताण-तणावात होता कामा नये याची विशेष काळजी पालकांनी घेणं गरजेचं आहे. किंबहुना गाफील न राहता आपलं मूल कळत-नकळतपणे तणावाखाली तर वावरत नाही ना याची खातरजमा प्रत्येक पालकाने करणे आवश्यक आहे. एक चांगली बाब म्हणजे वर्षागणिक १०वी-१२वी निकालांचा टक्का वाढतोय तशी नापासांची संख्याही कमी होतेय आणि पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निकालाच्या टक्केवारीतसुद्धा घसघशीत वाढ होताना दिसत आहे. असे असले तरी दर वर्षी लाखो (२०१५-३,८०,०००) विद्यार्थी नापास होत असतात. त्यांच्यासाठी यशाने हुलकावणी दिलेली असते आणि येणाऱ्या काळात योग्य मार्गदर्शन प्राप्त करून ते पदरी पाडून घेण्याचं आव्हान त्यांच्या समोर उभं ठाकलेलं असतं. कारणं काहीही असोत पण ऐन महत्वाच्या टप्प्यावरचं अपयश पचवणं आणि त्यावर मात करणं प्रत्यक्षात सहज शक्य नाहीये पण आत्मविश्वास आणि प्रयत्नांनी साध्य होण्यासारखं मात्र नक्कीच आहे. त्यातही अशा पडत्या काळात पाठीशी ठाम उभं राहण्याची पालकांची भूमिका महत्वाची ठरते.

एकदाचे १०वी-१२वीचे निकाल लागले की एकूणच विद्यार्थी व पालकांचा जीव भांड्यात पडतो. परंतू इथून पुढे प्रवेशाची मोठी बिकट परीक्षा मात्र द्यावी लागणार असते. ज्यांना उत्तम गुण मिळालेत त्यांच्यासाठी हि परीक्षा काहीशी सोपी असते तर कमी गुण मिळालेल्यांसाठी मात्र जिकिरीची होणार असते. एक-दोन मार्कांनी अपेक्षित ठिकाणी प्रवेश हुकतो तेव्हा 'जब चिड़िया चुग गई खेत, अब पछतावे क्या होय' या उक्तीसारखं पश्चाताप करायची वेळ येते आणि वाटतं अजून थोडा अभ्यास केला असता तर मनासारखं झालं असतं. म्हणूनच मग अभ्यास, शिक्षण आणि करीअरचं नियोजन हे १०वी-१२वी वर्षाच्या सुरुवातीपासून करणं फायद्याचं ठरतं.

खरं तर करिअरची निवड या प्रश्नावर विचार करायला विद्यार्थी व पालकांना निकालानंतर वेळच मिळत नाही आणि तेव्हा ते त्यांच्या हातातसुद्धा नसतं. कारण मार्क जिकडे नेतील जिकडे जाणंच त्यांना क्रमप्राप्त असतं. मिळालेल्या मार्कांच्या आधारे ते जे काय निवडतात तर तो शिक्षणक्रम असतो मनासारखं किंवा आवडीचं करिअर नव्हे. करिअरचा गांभिर्याने विचार, मूळात करिअर म्हणजे काय? आर्ट्स, सायन्स, कॉमर्सची निवड म्हणजेच करिअरची निवड की त्यापेक्षा वेगळं काही आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची आदर्श वेळ म्हणजे अगदी १०वी-१२वीचं शैक्षणिक वर्ष सुरु होतं ती असायला हवी. म्हणजे करिअर विषयीच्या विविध पैलूंवर विचार करुन ठराविक दिशा ठरवता येते. मग त्यानुसार अभ्यासाचं नियोजन शक्य होतं आणि ते केल्यावर निकालानंतर हवं ते करिअर निवडणं सोपं आणि शक्यही होतं. निकालानंतर 'अमूक एका अभ्यासक्रमाला जायची इच्छा तर आहे किंवा अमूक एका संस्थेत प्रवेश घ्यायचाय परंतु बघू काय होतंय ते' या प्रतिक्रियांमधून हिच बाब प्रकर्षाने जाणवते.

## करिअर-अभ्यासक्रमाची निवड

१०वी-१२वी नंतर घेतलेले निर्णय संपूर्ण आयुष्यावर परिणाम करणारे ठरतात. सारासार विचार करुन घेतलेला एक अचूक निर्णय तुमचं करिअर घडवू शकतो तर अपुऱ्या माहितीच्या आधारे, डोळे झाकून किंवा इतरांचं बघून घेतलेला निर्णय तुमचं करिअर गोत्यात आणू शकतो. आपला स्वतःवर असलेला विश्वास, प्रयत्नपूर्वक मिळवलेली यथार्थ माहिती, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला आणि 'सध्या कुठल्या क्षेत्रात जास्त स्कोप आहे' या सारख्या भ्रामक कल्पनांच्या जाळ्यात न अडकता चौकस बुद्धीच्या सहाय्यानेसुद्धा योग्य निर्णय घेणं शक्य आहे. शिवाय करिअर हि तशी आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. यदाकदाचित एखादा निर्णय चुकला तरी त्यातून योग्य तो धडा घेऊन सुधारणा करता येते, वाट सुद्धा बदलता येते. यात निर्णय घेण्याची क्षमता, थोडंसं धाडस आणि त्यातून मिळणारा अनुभव

जास्त महत्वाचा ठरतो. वेळप्रसंगी तोच पुढील यशाची वाट सुद्धा दाखवतो. १०वी–१२वी नंतर करिअर उर्फ अभ्यासक्रमाची निवड स्वतःचा कल, स्वतःची आवड, क्षमता आणि त्यानुरूप उपलब्ध पर्याय या मुद्यांच्या आधारे केली तर त्यात यशस्वी होण्याचा पुढचा टप्पा सोपा होऊन जातो. याचं साधं आणि सोपं कारण म्हणजे आवड आणि क्षमता असेल तर अभ्यास मन लावून होतो, चांगला नव्हे उत्तम होतो. अभ्यास उत्तम झाला तर निकाल आणि पुढील परिणाम चांगलेच येतात. त्यातूनच निवडलेल्या विषयात नैपूण्य प्राप्त होतं आणि एक उत्तम करिअर घडवलं जातं. कोणताही अभ्यासक्रम मग तो इंजिनियरिंगचा का असेना जेमतेम ५०–५५ टक्के गुण मिळवून पूर्ण केला तर त्यानंतर संधी कमी होतात, नोकरी मिळवण्यात अडचणी येतात आणि शेवटी एवढं शिकून काय फायदा असं म्हणण्याची वेळ येते. या उलट आज कला शाखेला कोणीही स्वतःहून जायची तयारी दाखवत नाहीत, परंतु कला शाखेतील अर्थशास्त्र, मानसशास्त्र, भाषा, राज्यशास्त्र अशा कोणत्याही विषयाचा मनापासून अभ्यास करुन त्यात नैपूण्य मिळवून उत्तम करिअर घडू शकतं.

१०वी–१२वीचे मार्क करिअरची दिशा निश्चित करतात हे खरं असलं १०वी–१२वीचे मार्क म्हणजेच उत्तम करिअर हे मात्र अजिबात खरं नाही. ज्यांना आता चांगले गुण मिळाले म्हणजे त्यांना आता पुढे चिंता करायची गरज नाही असं अजिबात नाही तर मार्क हा अभ्यासाचा–शिक्षणाचा एक पैलू फक्त आहे. घोकंपट्टी किंवा तत्सम मार्गांनी पुस्तकी अभ्यास करून जास्तीत जास्त मार्क मिळवून शैक्षणिक पदव्या मिळवणे हा शिक्षणाचा मूळ हेतू नसून त्या त्या विषयातलं सखोल ज्ञान आत्मसात करून त्याचा व्यवहारात वापर करण्याची क्षमता अंगी येणं हा आहे. आजकाल तर हे जास्तीच महत्वाचं झालंय. मग त्यासोबत पदव्या ओघाने येतातच. ज्यांना कमी गुण मिळालेत त्यांनी यापुढे मात्र आवडीच्या व झेपेल अशा अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन त्यात उत्तम प्रगती दाखवणं आवश्यक आहे. तसं केलं तर पुढे जाऊन ते सुद्धा चांगलं करिअर घडवू शकतात आणि त्यानंतर मग कोणी विचारणारही नाही की १०वी–१२वीत त्यांनी किती गुण मिळवले होते? या करिअरविषयीच्या प्राथमिक परंतु मुलभूत गोष्टी आहेत. त्या विद्यार्थी आणि पालकांनीसुद्धा विसरता कामा नयेत. किंबहुना या मुलभूत संकल्पनाच भविष्यातील यशाची गुरुकिल्ली ठरतात.

## करिअर अर्थात अभ्यासक्रमाच्या वाटा –

आज कालानुरूप करिअरची अनेक नव–नवी दालने नव्या पिढीसाठी उघडताहेत हि आनंदाचीच बाब आहे. परंतु त्यामुळेच की काय नेमकी कोणती वाट निवडावी याविषयीचा गोंधळही तेवढाच वाढला आहे. यातून मार्ग काढण्याचे उपायही विज्ञान–तंत्रज्ञानामुळे उपलब्ध आहेत. अभ्यासक्रम किंवा संस्थेविषयी आपल्याला हवी असलेली कोणतीही माहिती इन्टरनेटच्या सहाय्याने मिळवता येते. तेव्हा करिअर वा अभ्यासक्रमाचे उपलब्ध पर्याय अनेक असले तरी त्यांची माहिती घेणं आवश्यक आहेच परंतु त्यातले कोणते पर्याय आपल्यासाठी योग्य ठरतील हे समजून घेणं जास्त महत्वाचं आहे. त्यासाठी आपली कल चाचणी करणं हा शास्त्रिय व उपयोगी ठरणारा पर्याय असून त्याचा अवलंब करणे याशिवाय आपल्या सारासार विवेकबुद्धीचा वापर करून निर्णय घेणे योग्य ठरते.



## कला शाखा –



अगदी कला शाखा म्हटली तरी त्यात भारतीय भाषा–साहित्य, परकीय भाषा, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, भूगोल, इतिहास, समाजसेवा, वृत्तपत्र विद्या, कायदा, शिक्षण शास्त्र, उपयोजित कला शास्त्र, जाहिरात आणि माध्यमे, ग्रंथालय शास्त्र आणि शेवटी नाट्य, लेखन, अभिनय, गायन, संगीत, नृत्य या सारख्या सादरीकरणाच्या कला असे अनेक पर्याय आहेत आणि त्यातसुद्धा उत्तम करिअर घडू शकतं. अगदी दरवर्षी नागरी–सनदी सेवा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये कला शाखेतील विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते. कारण मूळातच या परीक्षेच्या अभ्यासक्रमात कला शाखेतील विषयांचा समावेश मोठ्या प्रमाणावर असतो. आज आपल्या सर्वांच्या मना–मनावर जर कोणाचं राज्य असेल तर ते चित्रपट

अभिनेते व अभिनेत्री यांचे ! त्या क्षेत्रात स्पर्धा आणि संघर्ष खूप आहे परंतु एकदा का संधी मिळाली आणि आपली योग्यता सिद्ध केली तर पैसा, प्रसिद्धी, मान–सन्मान आणि जगातील सर्व सुखे–आनंद–समाधान तुमच्या पायाशी लोळण घेत असतं. अशा या कला शाखेला आपल्याला निरुपयोगी किंवा निम्न दर्जाची शाखा कसं म्हणता येईल ?






### वाणिज्य शाखा –

काल परवापर्यंत वाणिज्य शाखेत खूपसे पर्याय नव्हते. आज मात्र ती परिस्थिती राहिलेली नाही. जगाच्या एकूणच व्यवहारात पैशाला म्हणजेच वाणिज्य शाखेला अपरंपार महत्व आहे. म्हणून त्यातही उत्तम करिअर घडवण्याच्या अनेक संधी आहेत हे वेगळं सांगायला नको. सर्वसाधारण बी.कॉम. सोबत वाणिज्य शाखेतील महत्वाच्या विषयांशी संबंधित विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. यात अकाउंटंसी अँड फायनान्स, बँकिंग अँड इन्शुरन्स, फायनान्शिएल मार्केटस्, व्यवस्थापन शास्त्र यासारख्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. जगाचा संपूर्ण व्यवहार, देवाण–घेवाण पैशावर चालत असल्याने वाणिज्य शाखेत अत्त्युच्च शिखरावर नेणारी करिअर्स् आहेत. त्यासाठी आवड, चिकाटी आणि मेहनत करायची तयारी मात्र हवी.

### विज्ञान शाखा –

वर्षानुवर्षे जी करिअर्स् सर्वोच्च स्थानावर आहेत ती म्हणजे डॉक्टर, इंजिनियर आणि त्यासाठी आवश्यक विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम ! म्हणूनच प्रत्येक विद्यार्थी आणि पालक यांची पहिली पसंती विज्ञान शाखेलाच असते. एखाद्या गोष्टीची इच्छा असणं यात वावगं असं काही नाही परंतु अट्टाहास मात्र चुकीचा ठरतो. ज्यांना त्या विषयांची आवड असेल त्यांची क्षमता असेल त्यांनी खुशाल जावं आणि रुग्णसेवेद्वारे मानवजातीची सेवा करावी त्याचप्रमाणे विज्ञान–तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुसह्य व्हावं यासाठी आपलं योगदान द्यावं. या व्यतिरिक्त केवळ पैसा, समाजात व कुटुंबात मानाचे स्थान, आजूबाजूच्या लोकांचे अंधानुकरण आणि स्पर्धा हे उद्देश दृश्य किंवा सुप्त स्वरुपात ठेवून विज्ञान शाखेची निवड केली तर पदरी निराशाच पडण्याची शक्यता जास्त असते. कारण आवड आणि क्षमता नसेल तर जेम–तेम गुणांनी विज्ञान शाखेतील शिक्षण हे नोकरी मिळवताना गळ्यातील धोंड बनू शकतं. तेव्हा कशाची निवड करायची हे ठरवत असताना काय निवडायचं नाही हे सुद्धा सुस्पष्ट असायला हवं.

विज्ञान शाखेत वैद्यकीय व अभियांत्रिकी शिवायही अनेक पर्याय आहेत. मूळ विज्ञान शाखेत रसायन शास्त्र, भौतिक शास्त्र व जीवशास्त्र हे मुख्य विषय असले तरी त्यात वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र, सूक्ष्म जीव शास्त्र, जैविक तंत्रज्ञान, जनुकिय अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र हे आणि असे अनेक पर्याय आहेत. कशाचीही निवड करताना फायदे, संधी आणि तोटे, तसेच संभाव्य अडचणी काय येऊशकतात याचा साधक–बाधक विचार करून बघावा. त्याने आपल्याला लगेच उत्तरं मिळतात आणि निर्णय घेणं सोपं होतं. आजकाल वैद्यकीय शिक्षण अत्यंत महागडं तर झालं आहेच शिवाय शिक्षणानंतर स्थिर–स्थावर व्हायला खूप मोठा काळ जावा लागतो. अभियांत्रिकीमध्ये नुसती पदवी मिळवून फायदा नसतो तर त्या–त्या विषयाच्या व्यावहारिक वापराच्या क्षमतेवर आपली पात्रता ठरते. या बाबींचं नियोजन केलं तरच विज्ञानांत उत्तम करिअर आहे !

### करिअर–अभ्यासक्रमाची निवड आणि प्रवेश घेताना लक्षात घेण्याचे मुद्दे....

- तथाकथित उत्तम (स्कोप असणारे) समजले जाणारे अभ्यासक्रम निवडण्यापेक्षा आपली आवड आणि क्षमता ओळखून अभ्यासक्रम निवडा व त्यात सर्वोत्तम कामगिरी करण्याचं उद्धिष्ट ठेवा.
- संस्थेऐवजी अभ्यासक्रमाला प्राधान्य द्या. कारण संस्था नामांकित असेल परंतु विषय तुमच्या आवडीचे नसतील तर तुम्हाला त्या संस्थेचा फायदा होणार नाही.

- अभ्यासक्रमाची निवड करताना करीअरचं दिर्घकालीन उद्धिष्ट डोळ्यासमोर ठेवा. म्हणजे आता करीत असलेला अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर तुम्हाला कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल किंवा कोणत्या क्षेत्रात तुम्हाला संधी उपलब्ध होतील.
- १०वी–१२वीच्या निकालात ३५ टक्के ते ६५ टक्के मिळवणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात म्हणजे निम्मेच्याहीवर असते. आकड्यात सांगायचे झाले तर जवळ–जवळ नऊ लाखांच्यावर १०वीचे व दहा लाखांच्यावर १२वीचे विद्यार्थी हे अगदी सर्वसाधारण गुणांनी उत्तीर्ण होत असून नेमकं काय करायचं अशा गोंधळलेल्या अवस्थेत असतात. मग नापासांची तर गोष्टच सोडा. परंतु या विद्यार्थ्यांनी धीर सोडू नये. अभ्यासक्रम तसेच करिअरची योग्य निवड केली, दिशा ठरवली तर यापुढे उत्तमोत्तम कामगिरी करून ते आयुष्यात यशस्वी होऊ शकतील. खरं तर महाराष्ट्रातील या सर्व विद्यार्थ्यांना एकत्रितरित्या मार्गदर्शन मिळाले तर त्यांचा गोंधळ दूर होऊन ते योग्य दिशेने वाटचाल करू शकतील.

**करिअर–अभ्यासक्रमाची निवड आणि प्रवेश घेताना पालकांनी लक्षात घेण्याचे मुद्दे.....**

- कृपा करून आपल्या इच्छा–आकांक्षांचे ओझे विद्यार्थ्यांच्या खांद्यांवर लादू नका.
  त्यांची आवड, कल व क्षमता जोखूनच अभ्यासक्रम व करिअरची निवड करा.
- स्कोप किंवा पैसा यापेक्षा गुणवत्तेला महत्व द्या. कारण गुणवत्ता असेल तर पैसा व इतर बाबी आपोआपच येतात. आवड व क्षमता असल्याशिवाय मेहनत करता येणार नाही आणि मेहनत केली नाही तर गुणवत्ता येणार नाही हे समीकरण समजून घ्या.
- विद्यार्थ्यांचे नुसते पुस्तकी ज्ञान व मार्कांवर अवलंबून न राहता ज्ञानाचा व्यावहारिक वापर, व्यक्तिमत्व, चारित्र्य व कौशल्य विकास, प्रगतीकारक सवयी व सकारात्मक मानसिकता याकडेही प्राधान्याने लक्ष द्या. म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य होईल. त्याचा कुटुंबाला, समाजाला, राज्याला आणि देशालाही लाभ होईल.

शेवटी करिअर घडवणं असो की जीवनातील कोणत्याही क्षेत्रात यश मिळवणं असो एक फॉर्म्युला नेहमी लक्षात ठेवा –

**'एक तर जे आवडतं तेच करा किंवा मग जे करताय ते मन लावून आवडीने करा'**

महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थी व पालकांना उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक अनेकानेक शुभेच्छा !

**महेंद्र बैसाणे,**
अभ्यास, शिक्षण, करिअर व नैतिक मूल्यशिक्षण यावर मार्गदर्शन करणारी वेबसाईट
www.bharukaka.com चे संस्थापक व मुंबई विभागीय मंडळाद्वारे
परीक्षांदरम्यान नियुक्त समुपदेशक

